**नि.फौ.ख.क्र.** ८४/२०१५

**सरकार वि. संजय व इतर**

**CNR No.MHWS080004532015**

**<u>निशाणी क्र. २६ खालील आदेश</u>**

आरोपी क्र. ०१ व ०२ यांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ प्रमाणे दाखल केला आहे. त्यांच्या कथनानुसार, फिर्यादी ओम रमेश पवार याने दिलेल्या तक्रार/फिर्याद वरुन आरोपींविरुध्द महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ प्रमाणे कलम ३९ नुसार गुन्हा दाखल झाला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.

**<u>०२</u>** फिर्यादीने दिलेल्या तक्रारमधील कथनानुसार फिर्यादीने आरोपींकडून २०,०००/- रुपये उसणे व्याजाने घेऊन त्यास अटक म्हणून फिर्यादीच्या वडीलांचे धनादेश दिले. एकुण रक्कम रुपये २१,५००/- व्याजाची रक्कम परतफेड केली व त्याबाबत कोरे धनादेश दिले असे नमुद केले असून आरोपी क्र. ०१ ने सन २०१३ मध्ये फिर्यादीच्या वडीलांच्या नावाचा धनादेश वटविण्यास लावला. आरोपींचे किराणा दुकान असुन गावात व आजुबाजुचे गावात विनापरवाना आरोपी सावकारी व्यवसाय करतात, अशी तक्रार फिर्यादीने सहा. निबंधक यांचेकडे केली होती. त्यामध्ये त्यांनी कागदपत्रे जप्त केली असून आरोपी क्र. ०१ व ०२ विनापरवाना अवैधरित्या सावकारी करतात, अशी तक्रार केल्याचे नमुद केले आहे. फिर्यादीने सत्यपरिस्थिती लपवुन ठेऊन राजकीय व व्यावसायीक द्वेषापोटी, वाईट उद्देशाने प्रेरीत होऊन सदर फिर्याद फिर्यादीने आरोपींविरुध्द दाखल केली.

**<u>०३</u>** आरोपीविरुध्द कलम ३९ महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ लावले असून फिर्यादीने नमुद केले व्यवहार हे दिनांक १६.०१.२०१४ पुर्वीचे असल्यामुळे ते कलम आरोपींविरुध्द लागू शकत नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ नुसार सकृत दर्शनी केस सिध्द होऊ शकत नसल्याचे म्हटले. तसेच सदर कलम ही अजामीनपात्र असून आरोपींविरुध्द नियमानुसार लावण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द या कलमाखाली दोषारोप करता येत नाही. फिर्यादीपक्षाने आरोपींविरुध्द सदर कलमाखाली प्रकरण दाखल

करण्यापुर्वीची आवश्यक परवानगी घेतलेली नाही. तसेच त्याकरिता लागणारा पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. दोषारोपपत्रातील आरोप हे निराधार असून दोषारोप ठेवण्याइतपत पुरावा नसल्याने सुडबुध्दीने दाखल केलेल्या प्रकरणातून आरोपींना दोषमुक्त करण्याची विनंती केली.

__०४__ याउलट अभियोगपक्षाने म्हणणे दाखल केले की, त्यांनी आरोपींच्या अर्जातील सर्व मजुकर त्यांना नाकबुल असून दोषारोपपत्रानुसार प्रथमदर्शनी दोन्ही आरोपींविरुध्द भरपुर व सबळ कागदोपत्री पुरावा उपलब्ध आहे. तसेच फिर्यादीने कायदेशीररित्या दिनांक ०७.०२.२०१४ रोजी सहा. निबंधक यांना तक्रार अर्ज केला. त्याआधारे सहा. निबंधक यांनी कायद्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे व दिनांक १२.१२.२०१४ रोजी आरोपींविरुध्द न्यायनिर्णय दिला व सदर न्यायनिर्णयाची प्रत प्रकरणात दाखल केली असून सहा. निबंधक यांनी संबंधीत पोलीस स्टेशनला पत्र दिले असून सदर पत्र प्रकरणात दाखल केले आहे.

__०५__ प्रकरणातील गुन्हा हा निरंतर स्वरुपात घडणा–या गुन्ह्याच्या कक्षेत मोडत असून उक्त कायद्याचे कलम ४८ (क) नुसार कलम ३९ अन्वये अपराध हा दखलपात्र अपराध आहे. प्रकरणातील उक्त कायद्याप्रमाणे कर्जाच्या बदल्यामधील व्यवहार हा अर्जाच्या तारखेपासून किंवा सहा. निबंधकांच्या कलम १६ व १७ चे तपासणीपासून पाच वर्षाच्या आतील असावा, असे अभिप्रेत आहे. दोषारोपपत्रानुसार आरोपींविरुध्द दाखल केलेली कागदपत्रे, साक्षीदारांचे जवाबावरुन आरोपींविरुध्द प्रथमदर्शनी केस सिध्द करण्याइतपत पुरावे प्रकरणात आहेत. आरोपींचे अर्जातील मुद्दे तथ्यहीन असून प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आरोपींना दोषमुक्त करणे बाबतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

__०६__ दोन्ही पक्षांचे कथन ऐकले. आरोपींच्या वकीलांनी नि.क्र. ३० खाली दिनांक ३१.१०.२०२२ रोजी लेखी युक्तीवाद दाखल केला. त्यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादीने दिनांक ०७.०२.२०१४ रोजी आरोपींविरुध्द साह.निबंधक सहाकारी संस्था तथा सावका-यांचे निबंधक यांच्याकडे केलेल्या तक्रारीत असे नमुद केले की, त्याला पैशाची आवश्यकता असल्याने दिनांक ३०.११.२००९ रोजी आरोपी क्र. ०१ कडून वीस हजार रुपये कर्ज स्वरुपात व्याजाने घेतले. सदर रक्कमेवरील दहा हजार रुपये रक्कमेला दररोज चाळीस रुपये या दराने व्याज

देण्याचे ठरले. व्याज व मुद्दल परत केल्याचे नमुद केले. सदर व्यवहारामध्ये अटकाव म्हणून फिर्यादीकडून त्याच्या वडीलांचे धनादेश क्र. ०२४५०२५ वर २,००,०००/- रुपये एवढी रक्कम व धारक म्हणून आरोपी क्र. ०१ चे नाव लिहून आरोपीने धनादेशाचा दुरुपयोग केल्याचे व त्याचे इतर व्यक्तींशी सावकारी व्यवहार असल्याचे नमुद केले आहे.

**०७** त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, तक्रार अर्जानुसार शहानिशा करण्यासाठी सावकारी अध्यादेश कलम १६ अंतर्गत संक्षिप्त चौकशी करुन सदर प्रकरणा तेरा जणांचे जवाब नोंदविले. आरोपी क्र. ०१ च्या रिसोड येथील व्यवसायवर धार टाकून काही कागदपत्रे व धनादेव व व्यवहारांच्या नोंदी असलेली कागदपत्रे जप्त केले. तेरा जणांच्या जवाबा पैकी सात जणांनी आरोपी क्र. ०१ सोबत सावकारीचा व्यवहार नसल्याचे म्हटले. फक्त इतर सहा जणांच्या जवाबावरुन व ते फिर्यादीचे नातेवाईक व मित्र असल्याने त्यांनी आरोपींविरुध्द जवाब दिल्याचे म्हटले. सहा. निबंधक यांनी अवैध सावकारी व्यवहार केल्याचे सिध्द झाल्यामुळे फिर्यादीच्या तक्रार अर्ज मान्य केल्याचा आदेश केला. आरोपी क्र. ०१ च्या व्यवसायाच्या ठिकाणी झडती घेताना आरोपी क्र. ०२ चे काही कागदपत्र सापडल्याने त्याला सुध्दा प्रकरणात समाविष्ट केले.

**०८** त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, दोन्ही आरोपींचा गुन्ह्यात कुठलाही सहभाग नसून केवळ आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीच्या वडीलांविरुध्द पराक्रम्य अभिलेख कायदा १३८ नुसार प्रकरण दाखल केल्याचा राग मनात धरुन जाणुनबुजून प्रकरण दाखल केल्याने आरोपींना दोषमुक्त करण्यासाठी सदर अर्ज दाखल केल्याचे म्हटले. दोषारोपनिश्चितीकरिता प्रथमदर्शनी पुरावा आवश्यक असून प्रथमदर्शनी पुराव्याची कोणतीही स्पष्ट व्याख्या नसून आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याची स्थिती असणे म्हणजे प्रत्यक्षदशीr पुरावा असल्याने तशी परिस्थिती या प्रकरणात नसल्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**०९** त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, प्रकरण सात वर्ष जुने असून आरोपी नियमीत हजर आहे. प्रकरणाचे गांभीर्य प्रथम दर्शनी पुराव्यावरुन ठरवावे लागते. तक्रार अर्जातील सर्व व्यवहार हे महराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ हा कायदा अस्तीत्वात येण्याअगोदरचे म्हणजेच २०१४ च्या पुवीrचे असल्याने सदर

कायद्यातील कलम ३९ आरोपींना लागू होत नाही. तपासी अधिका-यांनी आरोपींविरुध्द खोटा गुन्हा दाखल केला. नवीन कायद्यानुसार कलम ३९ आरोपींविरुध्द दाखल करतांना योग्य ती परवानगी घेऊन गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. या प्रकरणात न्यायालयाची परवानगी घेतलेली नाही. तसेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ च्या कलम ४८ नुसार कलम ०४ चे उल्लंघन केल्यावरच कलम ३९ हा दाखल होत असतो, असे म्हटले.

<u>१०</u> त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, सहा.निबंधक यांच्या दिनांक १२.१२.२०१४ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता त्या प्रकरणात तेरा व्यक्तींचे जवाब घेण्यात आले. काही ठरावीक लोकांच्या जवाबावरुनच सदर गुन्हा दाखल करण्याचे पत्र त्यांनी पोलीस स्टेशन अधिकारी यांना दिले. वास्तवीक पाहता फिर्यादीला फिर्याद देण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. तक्रार अर्जात फिर्यादीने नमूद केले की, त्याच्या वडीलांचे कोरे धनादेश आरोपी क्र. ०१ ने घेतले वडीलांची फसवणूक झाल्याचे फिर्यादी म्हणत असल्याने फिर्यादीच्या वडीलांनी तक्रार देणे आवश्यक आहेत.

<u>११</u> त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, आरोपी क्र. ०१ हा किराणा दुकानाचा व्यवसाय करीत असून फिर्यादीच्या वडीलांचा व्यवसाय त्याच्यासोबत होता. ते आरोपी क्र. ०१ कडून नगदी व उधारीने किराणा माल घेत असल्यामुळे त्यांची अगोदरच ओळख व देण्याघेण्याचा व्यवहार होता. फिर्यादीच्या वडीलांनी दिलेला धनादेश अनादरीत झाल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रकरण दाखल केल्याने वाईट उद्देशाने आरोपींविरुध्द खोटा गुन्हा दाखल केल्याचे सांगून फौ.प्र.सं कलम २३९ नुसार प्रथमदर्शनी पुरावा नसल्याने व आरोपीविरुध्द महाराष्ट्र सावकार अधिनियम २०१४ चे कलम ३९ लागू होत नसल्याने दोन्ही आरोपींना दोषमुक्त करण्याची विनंती केली.

<u>१२</u> आरोपींच्या वकीलांनी **बळीराम आश्रोबा कडपे वि. महाराष्ट्र राज्य २०१८ ऑल.एम.आर. क्रिमी २७०१** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेऊन म्हटले की, जर प्रकरणातील सर्व व्यवहार हे २०१४ सालापुर्वीचे असतील तर त्याला महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ लागू होत नाही. अशा वेळी सदर व्यवहारांना मुंबई सावकारी अधिनियम १९४६ लागू होतो. २०१४ च्या कायद्यात जरी

दखलपात्र गुन्हयाची नोंद असली तरी जुन्या कायद्यामध्ये काही गुन्हे अदखपात्र असल्याने त्याची नोंद करण्यापुवी्र परवानगी घेणे आवश्यक आहे.

<u>**१३**</u> आरोपींच्या वकीलांनी **नंदुबाई विठोबा पवार वि. महाराष्ट्र राज्य** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेऊन म्हटले की, त्या प्रकरणातील गुन्हे जरी १९८२ सालाचे असले तरी सरकारी वकीलांनी नवीन कायदा अस्तीत्वात आल्यानंतर गुन्हा दाखल करता येऊ शकतो, असे म्हटले असले तरी फौ.प्र.सं कलम ४६८ नुसार विलंब माफीचे प्रावधान केलेले नसल्याने तसेच तत्कालीन सरकारी वकीलांनी सावकारीच्या व्यवसायाबद्दल काही कथन केले नसल्याने वि. न्यायालयाने आरोपींविरुध्द दाखल प्रकरण खारीज केल्याचे म्हटले.

<u>**१४**</u> आरोपींच्या वकीलांनी **निलकंट केरप्पा संघशेट्टी वि. महाराष्ट्र राज्य** या न्यायनिर्णयावर भिस्त ठेऊन म्हटले की, त्या प्रकरणात दिनांक १०.०३.२००६ रोजीच्या खरेदीखतात वाद होता आणि तो गुन्हा २०१४ सालापुर्वीचा म्हणजेच महाराष्ट्र सावकारी अधिनियम अस्तीत्वात येण्याआधीचा होता. त्यामुळे जरी महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ कलम ३९ नुसार पाच वर्षाच्या शिक्षेचे प्रावधान असले तरी त्या प्रकरणातील व्यवहार २०१४ पुर्वीचा असल्याने त्याला १९४६ सालाचा कायदा लागू होत असून त्यातील कलम ३२ ब हे अदखलपात्र असल्याने फौ.प्र.सं कलम १५५ नुसार तपासणीची परवानगी आवश्यक असल्याचे म्हटले.

<u>**१५**</u> याउलट सरकारी वकीलांनी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायनिर्णय **बाळासाहेब रामराव बडे व इतर वि. महाराष्ट्र सरकार व इतर फौजदारी अर्ज क्र. ०४/२०१९ निकाल दिनांक ०९.०४.२०२१** वर भिस्त ठेऊन म्हटले की, जरी या प्रकरणात फिर्यादीचे आरोपीसोबतचे वाद २०१४ चा सावकारी अधिनियम अस्तित्वात येण्याच्या अगोदरचे असले तरी सावकारी दुय्यम निबंधकांनी केलेली कार्यवाही ही २०१४ सालाची असून फिर्यादी व्यतिरिक्त इतर सुध्दा ब–याच लोकांचे आरोपीसोबतचे व्यवहार अभिलेखावर आले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणाला २०१४ चा कायदा सुध्दा लागू पडत असल्याने आरोपींचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**१६** दोन्ही पक्षांचे कथन, युक्तीवाद आणि दाखल केलेले न्यायनिवाडे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीने पोलीस स्टेशनला फिर्याद देण्याअगोदर सहा. निबंधक सहकारी संस्था तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, रिसोड यांच्या कार्यालयात दिनांक ०७.०२.२०१४ रोजी तक्रार अर्ज केला होता. त्याअनुषंगाने महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ अंतर्गत कलम १६ नुसार चौकशी करण्यात येऊन सदर कार्यालयाने निर्णय क्र. सनिरि/विकास–१/अवैध सावकारी/तक्रार क्र. ०१–२०१४/ निर्णय/२३७२/२०१४ दिनांक १२.१२.२०१४ रोजी निर्णय पारीत करुन आरोपी/गैरअर्जदारांनी अवैध सावकारी व्यवहार केला असे सिध्द होत असल्याने अर्जदाराचा तक्रार अर्ज मान्य करण्याचा निर्णय दिला.

**१७** तसेच संबंधीत कार्यालयाने ठाणेदार पोलीस स्टेशन, रिसोड यांना सनिरि/विकास–१/अवैध सावकारी/तक्रार क्र. ०१–२०१४/ म.सा.(नि).अ/ कलम–३९/गुन्हा………/२०१४ असे पत्र दिनांक १२.१२.२०१४ रोजी पाठवून आरोपी/गैरअर्जदारांविरुध्द महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम २०१४ चे कलम ३९ अंतर्गत गुन्ह्याची (FIR) नोंद करुन त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागविला होता.

**१८** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीची जबाणी रिपोर्ट सुध्दा दिनांक १३.१२.२०१४ रोजी पोलीसांनी नोंदविला होता. तसेच प्रकरणात सहा. निबंधक सहकारी संस्था तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, रिसोड यांच्या कार्यालयाद्वारे जप्त करण्यात आलेली कागगपत्रे सुध्दा अभिलेखावर जोडलेली आहेत.

**१९** अभिलेखावर दाखल दिनांक १२.१२.२०१४ रोजीचे सहा. निबंधक सहकारी संस्था तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, रिसोड यांच्याद्वारे पारीत निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी/अर्जदाराचा अर्ज दिनांक ०७.०२.२०१४ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी फिर्यादीला दिनांक १८.०२.२०१४ माहिती मागविली होती. अर्जदार फिर्यादीने दिनांक २४.०२.२०१४ रोजी त्यांना माहिती सादर केल्यावर सदर माहिती व दाखल केलेल्या दस्तऐवजांच्या अनुषंगाने आरोपी/गैरअर्जदारांच्या व्यवसायाच्या ठिकाणी

दिनांक ०१.०३.२०१४ हा दिवस झडतीकरिता निश्चित करण्यात आला. झडतीच्या दिवशी संपुर्ण पथकासोबत आरोपी संजय याच्या व्यवसायाच्या ठिकाणी झडतीची/धाडेची कार्यवाही नियमानुसार करुन बरचशे आक्षेपार्ह दस्तऐवज जसे स्थावर मालमत्तेच्या ईसारचिठ्ठया, ईसार करारनामे, ताबा पावती, ताबा पावती सोडून दिल्याचे लेख, रिसोड येथील विविध बँकांचे एकुण १४ स्वाक्षरीत कोरे धनादेश, रोख पैशाच्या व्यवहारांच्या नोंदी असलेल्या रोजमेळ नोंदी वह्या जप्त केल्या.

<u>२०</u> संबंधीत कार्यालयाने जप्त कागदपत्रांची छाननी करुन सात प्रकारांमध्ये वर्गीकृत केली. त्यानंतर संबंधीत दस्त लिहून घेणा–या व देणा–या व्यक्तींचे जवाब व साक्ष नोंदवून चौकशीअंती आरोपी हे अवैध सावकारी व्यवसाय करीत असल्याचा निर्णय दिला व त्याअनुषंगाने संबंधीत पोलीस स्टेशनला गुन्हा करण्यासंबंधी पत्र पाठविले. त्यानुसार फिर्यादीचा जबाणी रिपोर्ट घेण्यात येऊन आरोपींविरुध्द दिनांक १३.१२.२०१४ रोजी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्याअनुषंगाने तपासअंती दिनांक ०५.०६.२०१५ रोजी दोन्ही आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

<u>२१</u> प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने आरोपींच्या वकीलांचे कथन आहे की, आरोपींचे फिर्यादीसोबत झालेले सर्व व्यवहार २०१४ पुर्वीचे असल्याने त्यास महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९ लागू पडत नसून पुर्वीचा सावकारी कायदा मुंबई सावकारी अधिनियम १९४६ लागू होतो. परंतु फिर्यादीचे आरोपींसोबतचे व्यवहार २०१४ सालापुर्वीचे असले तरी सहा. निबंधक सहकारी संस्था तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, रिसोड यांच्याकडे २०१४ साली तक्रार करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने चौकशी होऊन १२.१२.२०१४ रोजी आरोपी सावकारी व्यवहार करीत असल्याचे सिध्द झाल्याने त्यांनी पोलीस स्टेशनला कार्यवाही करण्याचे पत्र दिले आहे.

<u>२२</u> तसेच अभिलेखावर दाखल जप्त दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक ०१.०३.२०१४ रोजी करण्यात आलेल्या

झडती किंवा धाडेमध्ये केवळ फिर्यादीसोबत झालेल्या व्यवहाराचेच दस्तऐवज जप्त केलेले नसून इतर बरेचशे आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आलेले आहेत. दिनांक १२.१२.२०१४ रोजीच्या सहा. निबंधक सहकारी संस्था तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, रिसोड यांच्या आदेशाचे व निर्णयाचे अवलोकन केले असता त्यात सदर साहित्याबाबत व झडतीबाबत विस्तृत विवेचन केलेले असून ब–याच लोकांच्या व्यवहाराबाबतची नोंद आढळून आलेली असून आरोपी संजय याच्याशी नियमीतपणे पैशाची व्यवहार करणा–या **तीस** (३०) व्यक्तींचे नावे नमुन्या दाखल तपासणीकरिता छाननी अहवालात नमुद करण्यात आली.

<u>**२३**</u> वरील विवेचनावरुन असे निर्देशनास येते की, जरी फिर्यादीने जबाणी रिपोर्ट दिलेला असला तरी सहा. निबंधक सहकारी संस्था तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, रिसोड यांनी सुध्दा पोलीस स्टेशनला त्यांच्या अहवालाची व न्यायनिर्णयाची प्रत देऊन व जप्त केलेला दस्तऐवजांची प्रत देऊन गुन्हा नोंद करण्यास म्हटले. अभिलेखावर जवळपास ४०० ते ५०० दस्तऐवज दाखल केलेले असून त्यात ब–याच विविध लोकांची नावे नमुद असून ब–याचशा नोंदी पैशांच्याबाबत सुध्दा नमुद आहेत. तसेच ब–याचशा खरेदी विक्रीचे व्यवहार, बॉड, सौदयाची ईसारचिठ्ठी, आरोपींकडून जप्त केलेल्या नोंद वह्या, कोरे धनादेश इत्यादी दस्त नमुद आहेत.

<u>**२४**</u> जप्त केलेल्या दस्तऐवजांचे अवलोक केले असता असे दिसून येते की, जरी बरेचशे व्यवहार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या पुर्वीचे असले तरी प्रकरणात ब–याच लोकांची नावे नमुद असून प्रकरणात जप्त को–या धनादेशावर कुठल्याही तारखा नमुद नाहीत. तसेच आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या नोंद वही मध्ये ब–याचशा नोंदी ह्या जानेवारी २०१४, फेब्रुवारी २०१४ म्हणजेच जवळपास दिनांक ०१.०३.२०१४ रोजीपर्यंतच्या प्रतिदिनाच्या नोंदी असून त्या नोंदी ब–याच व्यक्तींकडून रक्कम देवाणघेवाणीच्या आहेत.

<u>**२५**</u> महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा अध्यादेशद्वारा १६.०१.२०१४ रोजी अस्तीत्वात आला आणि फेब्रुवारी २०१४ मध्ये सदर कायदा अंमलात आणला गेला. त्यावरुन सदर कायदा हा १६.०१.२०१४ पासून

लागू पडत असल्याचे दिसून येते. जरी या कायद्यापुर्वी झालेल्या व्यवहारांना मुंबई सावकारी अधिनियम १९४६ लागू पडत असला तरी अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरणातील काही व्यवहार हे २०१४ सालापुर्वीचे असून काही व्यवहार हे ०१.०३.२०१४ दिनांकापर्यंतचे आहेत. तसेच प्रकरणातील प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपराधाची घटना घडल्याचा कालावधी हा २००९ सालापासून आजतागायत म्हणजेच गुन्हा नोंद होण्याचा दिनांक १३.१२.२०१४ पर्यंतचा नमुद केलेला आहे.

<u>२६</u> त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील सर्व व्यवहार २०१४ सालाचा कायदा अस्तीत्वात येण्यापुर्वीचे नाहीत. त्यामुळे सदर प्रकरणास मुंबई सावकारी अधिनियम १९४६ लागू पडणार नाहीत. कारण प्रकरणात फिर्यादीव्यतिरिक्त बरेच व्यक्ती असून प्रकरणात दिनांक ०१.०३.२०१४ पर्यंतच्या नोंदी जप्त केलेल्या आहेत. त्यामुळे काही व्यवहार हे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ लागू झाल्यानंतरचे आहेत. त्यामुळे सदर प्रकरणाला जुना सावकारी अधिनियम १९४६ मधील कलम ३२ (ब) लागू पडत असल्याचे व ते कलम अदखलपात्र असल्याने पोलीसांना तपासणी करण्याचे अधिकार नसल्याचे या घडीला स्पष्ट होत नाही. तसेच जप्त केलेले काही दस्तऐवज व नोंदी ह्या महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ लागू झाल्यानंतरच्या असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने सदर प्रकरणाला महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९ लागू पडत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

<u>२७</u> त्यामुळे आरोपींच्या वकीलांनी दाखल केलेले न्यायनिर्णय व न्यायनिवाडे त्यांचा संपुर्ण आदर राखून हाती असलेल्या प्रकरणास पुर्णपणे लागू पडत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. याउलट सरकारी वकीलांनी दाखल केलेले न्यायनिर्णय व न्यायनिवाडे हे हाती असलेल्या प्रस्तुत प्रकरणास पुर्णपणे लागू पडत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार आरोपींनी दाखल केलेल्या अर्जानुसार ते या घडीला फौ.प्र.सं कलम २३९ नुसार दोषमुक्त होण्यास पात्र ठरत नसल्याचे दिसून येत नसल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

प्रस्तुतचा अर्ज याघडीला नामंजूर करण्यात येत आहे.

स्वा/-

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः २९.०४.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 29.04.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 29.04.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 29.04.2023 |